# प्रकरण - दुसरे

---

# मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापना आणि कार्य

# प्रकरण - दुसरे

## मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापना आणि कार्य

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारताच्या धर्मनिरपेक्ष राजकीय व्यवस्थेमध्ये राष्ट्रीय एकात्मतेसाठी आणि मुस्लिम समाज प्रबोधन करीत असताना दलवाई यांना 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेची गरज का भासली? मंडळ स्थापन करण्यामागे कोणती उद्दिष्टे होती? मंडळाचा सरनामा आणि राज्यघटना काय सांगते? तसेच मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या संघटनाबरोबर त्याचा विकास व एकूण कार्याचा आढावा घेतला आहे. प्रामुख्याने मंडळाच्या वतीने घेतलेले विविध कार्यक्रम, परिषदा, परिसंवाद, मोर्चे, आंदोलने इत्यादीच्या माध्यमाने समाज प्रबोधनाच्या व राजकीय जागृतिच्या कार्याचा आढावा घेतला गेलेला आहे. सर्वप्रथम मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेची गरज का होती त्यामागची भूमिका समजून घेणे क्रमप्राप्त ठरते.

**मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेची गरज व भूमिका :**

भारताच्या स्वातंत्र्याबरोबर धार्मिक दूराग्रहातून भारताची फाळणी झाली व पाकिस्तानची निर्मिती झाली. भारतीय राष्ट्रीय नेत्यांनी जातीय दंगली आणि हिंदू-मुस्लिम प्रश्न मिटावा या भूमिकेतून फाळणीला मान्यता दिली. भारताच्या फाळणीमुळे हिंदू-मुस्लिम प्रश्न मिटला नाही तर, तो अधिक गुंतागुंतीचा बनत गेला. कधी दोन्ही समुदायातील धर्मांध शक्तींनी परस्परामध्ये द्वेष पसरवीला तर कधी राजकीय पक्षांनी मताच्या राजकारणासाठी हिंदू-मुस्लिम समाजात विष पेरण्याचे काम केले. परिणामी जमातवादी दंगली घडल्या.

हिंदू-मुस्लिम जातीवादाने भारतीय राष्ट्रीय एकात्मतेसमोर मोठे आव्हान उभे राहिले. बहुसंख्य असणाऱ्या हिंदू समाजापासून मुस्लिम समाजाला अकारण असुरक्षितता वाटू लागली तर, हिंदू समाज मुस्लिमांच्या राष्ट्रीयतेबद्दल शाशंक बनला. असे घडण्याचे कारण मुस्लिम समाजाचे मागासलेपण, दोन्ही समाजातील सनातनी

धर्मगुरू मंडळी आणि ब्रिटिशांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अवलंबलेली भेदनीती इत्यादी घटक कारणीभूत मानले जातात.

सन १९६५ साली हिंदू-मुस्लिम जातीय दंगली घडल्या. रांची, अहमदाबाद, भिवंडी, मालेगाव आणि देशाच्या विभिन्न भागात जातीय दंगली उसळल्या. "जातीय दंगलीने राष्ट्रीय एकात्मतेचा विचका उडाला. निधर्मी लोकशाहीचे धिंडवडे जगभर निघाले. देशाचे, त्यातील लोकशाहीचे भवितव्य धोक्यात येते की काय, धर्माच्या नावाखाली देशाची फाळणी करण्याची वेळ नजीकच्या काळात परत येते की काय, या शंकेने देशातील विचारवंत हतबद्ध होऊन बसले होते."[१] याच वर्षी पुण्यामध्येही हिंदू-मुस्लिम जातीय दंगली झाल्या. देशातील इतर भागातही दंगली सुरू होत्या. परिस्थिती हाताबाहेर जावू नये म्हणून त्यापूर्वीच उपाययोजना करणे गरजेचे होते. त्यासाठी हिंदू-मुस्लिम समुदायातील पुरोगामी मंडळी एकत्र येणे आवश्यक होते. जातीय दंगलींना आवर घालून दोन्ही समुदायामध्ये जातीय सलोखा निर्माण करण्याची निकड होती. अशा परिस्थितीमध्ये राष्ट्रसेवा दलाच्या संस्काराने सुसंस्कृत झालेल्या एका तरूणाने जातीवाद, व जमातवादाविरूद्ध आवाज उठविला. भारतीय समाजव्यवस्थेसमोर एका नव्या दृष्टीकोनातून विचार मांडण्यास सुरू केले. त्या तरूणाचे नाव हमीद दलवाई होते. हमीद दलवाईने जातीय दंगली व वाढत्या मुलतत्ववादाची कारणमीमांसा करण्यास तसेच, वाढत्या मुस्लिम मुलतत्ववादावर कडक टीका करण्यास व इस्लामच्या चिकित्सेला सुरूवात केली. मुस्लिम समाजाने धर्माकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन सोडून देवून वैज्ञानिक दृष्टीकोनाचा स्वीकार करावा. आणि या समाजाने अधिक आधुनिक बनून राष्ट्रीय प्रवाहात सामील व्हावे असे मत मांडले. त्याच बरोबर वाढत्या हिंदू धर्मांधतेवर ही टीका केली. राजकारण्यांनी मताच्या राजकारणासाठी मुस्लिम समाजाचा मुलतत्ववाद अप्रत्यक्षरित्या पोसलेला आहे. मतासाठी त्यांनी कालबाह्य प्रथांना चुचकारण्याचे काम केल्याने हा मुलतत्ववाद वाढलेला आहे. त्यामुळे यापुढे मुस्लिम

अनुनय करण्याचे बंद करावे. व मुस्लिम समाजाने जातीवादी सनातनी मुल्ला मौलवींच्या आधीन जावू नये. असे आवाहन केले. यामूळे हिंदू अंतरर्मुख बनले. मुस्लिम समाजातील जे सनातनी होते ते दलवाई विरूद्ध पेटून उठले. दलवाईवर कडाडून टीका करू लागले. इस्लामचा शत्रू, हिंदूंचा हस्तक अशा शेलक्या टीका दलवाईवर होवू लागल्या. तरीही दलवाई थांबले नाहीत. त्यांनी त्यांचे कार्य चालू ठेवले. हमीद दलवाई यांना मुस्लिम समाजातील मुलतत्ववादाला आवर घालून जातीय दंगली थांबविण्यासाठी कायमची उपाययोजना करावयाची होती. त्यासाठी त्यांना मुस्लिम पुरोगामी संघटनेची गरज वाटत होती. काही कालखंडानंतर पुण्यातील काही मुस्लिम तरूण मंडळी दलवाईंच्या पाठीशी उभी राहिली. पुण्यातील सय्यदभाई, मुनिर सय्यद अमीर शेख, अन्वर शेख, रफीउद्दीन सय्यद, बशीर तांबोळी, मकबूल तांबोळी यांच्याशी परिचय झाला. कोल्हापूरच्या दौऱ्यात हुसेन जमादार यांचा परिचय झाला. हुसेन जमादार यांच्या बरोबर एन. आर. बारगीर, महमदगौस नाईक, आय. एन. बेग व मुमताज रहिमतपुरे ही पुरोगामी मंडळी होती. अशाप्रकारे कोल्हापूर, पुणे, अहमदनगर, मुंबई, सातारा इत्यादी ठिकाणच्या तरूणांना एकत्र आणण्याचे विधायक काम समाजवादी नेते भाई वैद्य, बाबा आढाव यांनी केले. प्रा. अ. भि. शहा, यदुनाथ थत्ते, नरहर कुरूंदकर, प्रा. असफ ए. ए. फैजी, डॉ. मोईन शाकीर ही मंडळी दलवाई च्या पाठीशी पूर्वीपासूनच होती.

"२२ मार्च १९७० या रोजी हमीद दलवाईंच्या नेतृत्वाखाली सुमारे १०० पुरोगामी मंडळी मोर्चाने 'साधना' कार्यालयातील आंतरभारती सभागृहात जमली. आणि तिथे गुरूवर्य जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व यास्मिन लुकमानी यांच्या हस्ते उद्घाटन होऊन 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाची' स्थापना झाली. मंडळाचा जाहीरनामा व घटना त्यावेळी हमीद दलवाईंनी प्रसारीत केली."[२]

हमीद दलवाई मंडळाच्या स्थापनेनंतर जोमाने कामाला लागले. कारण दलवाईंना आपल्या विचारांना प्रत्यक्ष व्यवहारामध्ये उतरविण्यासाठी संघटनेची शक्ती मिळालेली होती.

**मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा जाहिरनामा :**

"भारतीय मुस्लिम समाजापुढे स्वातंत्र्योत्तर काळात नवी आव्हाने उभी राहिली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील सर सय्यद अहमद यांचा मुस्लिम समाजाच्या धार्मिक आणि ऐहिक दृष्टीकोनातून मूलभूत बदल घडवून आणण्याचा आरंभीचा प्रयत्न वगळल्यास, एरवी निराशाच पदरी येते. भारतीय मुस्लिम समाज या सर्व काळात आपल्या अल्पसंख्यांक स्थानाविषयी विनाकारण अतीव जाणीव बाळगून आपल्या सनातन, परंपरागत श्रद्धा कवटाळून बसलेला आणि बहुसंख्य हिंदू समाजाविरोधी आंदोलन करीत राहिला. सर सय्यद अहमद यांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या मुस्लिम सुधारणांचा गाडा देखील अखेरीस विभक्तवादाच्या दलदलीत रूतून गेला. पाकिस्तानची निर्मिती आणि भारतातील हिंदू-मुस्लिम संबंधातील तणावाचा इतिहास सर्वांना माहिती आहेच.

भारतात सर्वधर्मीय राष्ट्रीयता निर्माण करण्याच्या झालेल्या सर्व प्रयत्नात एक मूलभूत चूक सतत होत राहिली आहे ती अशी की, हिंदू समाजाला आधुनिक, विशाल आणि पुरोगामी बनावटीच्या आड येणाऱ्या जुनाट धर्मनिष्ठा बदलण्याचा एक सततचा प्रयत्न चालला असतानाच मुस्लिम समाजाच्या काल-विसंगत अशा परंपरागत श्रद्धांना हात न लावण्याचा आटापिटा मुस्लिम समाजाकडून करण्यात येत होता; आणि बहुसंख्य हिंदू समाजातील परिवर्तनवादी मंडळीदेखील या प्रक्रियेला कळत न कळत हातभार लावीत होती. आजदेखील या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. याचा परिणाम म्हणजे हिंदू समाजात आधुनिक राष्ट्रवादाचे, धर्मनिरपेक्षतेचे, आणि समतेच्या आधुनिक मानवी मूल्यांचे प्रवाह तुलनेने अधिक बळकट होत गेले; आणि मुस्लिम

समाज मात्र आपल्या जून्या श्रद्धांना चिकटून राहिला. सुशिक्षित मुस्लिमांची मजल यामूळे विभक्तवादी प्रवृत्तीपलीकडे कधी जाऊ शकली नाही. बदललेल्या परिस्थितीचे आव्हान त्यामूळेच मुस्लिम समाज स्वीकारू शकला नाही.

भारतातील हिंदू आणि मुसलमान समाजातील ही प्रबोधनाची दरी भरून काढल्याशिवाय खऱ्या अर्थाने या दोन्ही समाजांचे संबंध सुधारणार नाहीत; राष्ट्रीय एकात्मता निर्माण होणार नाही. आणि नव्या भारतातील प्रजासत्ताक मुस्लिम समाज राष्ट्रजीवनाचा एक सन्माननीय घटक म्हणून नांदू शकणार नाही. आपण लोकशाही जीवनपद्धती स्वीकारलेली असल्याने या प्रबोधनाची निकड निर्माण झालेली आहे. त्याशिवाय समाजातील सर्व क्षेत्रात स्त्री-पुरूष समानता निर्माण होणार नाही. व लोकशाहीचा पाया कमकुवतच राहील.

हे कार्य व्हावे म्हणून मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना करण्यात येत आहे. सत्यशोधक शब्दाला महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात एक विशिष्ठ अर्थ आहे. त्याप्रमाणे सामाजिक सुधारणांना प्रखर आंदोलनाची पार्श्वभूमी आहे. या मंडळाचे 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ' हे नाव ठेवताना महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची जाणीव या मंडळाच्या संस्थापक सभासदापुढे आहे.

वास्तविक स्वातंत्र्यानंतर अशी वेगळी सुधारणावादी का होईना विशिष्ट धर्मगटांसाठी मंडळे काढण्याची आवश्यकता असायला नको होती याची जाणीव आहे. परंतु मुस्लिम समाजाच्या प्रबोधनावर भर देण्यासाठी आज तरी मंडळाचे कार्यक्षेत्र त्या समाजापुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. जेव्हा सामाजिक बदलाची ही दरी नष्ट होईल तेव्हा हे मंडळ मुस्लिम समाजापुरते कार्य करणार नाही. आधुनिक विचारांच्या सर्व धार्मिक राष्ट्रवादी परंपरा मानणाऱ्या सर्वच भारतीयांच्या इच्छा आकांक्षानुसार एखाद्या नव्या आंदोलनात मंडळाच्या वेगळ्या अस्तित्वाची आवश्यकता उरणार नाही. तरी हि अवस्था यावी, आणि लवकर यावी म्हणून हे मंडळ कार्य करत राहील.''[३]

**मुस्लिम सत्यशोधक मंडळाची उद्दिष्ट्ये :**

अ) भारतीय मुस्लिम समाजात प्रबोधनाचे आंदोलन चालविणे या करिता.

ब) धर्मातील चिरंतन मूल्ये आणि कालबाह्य परंपरा यात फरक करण्याचा प्रवाह मुस्लिम समाजात निर्माण करणे. धर्म ही पारमार्थिक अर्थाने परमेश्वराच्या श्रद्धेची बाब आहे. याची जाणीव निर्माण करणे.

क) परमवीरचक्र अब्दुल हमीदचे नावे व्याख्यानमाला सुरू करणे. व्याख्यानमालेतून मुस्लिम समाजाला धर्मनिरपेक्ष वळण देणे.

ड) वाचनालय सुरू करणे व त्यात इस्लाम, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रवाद या विषयाचे साहित्य ठेवणे.

इ) इतर धर्मनिरपेक्ष संस्था आणि आंदोलनाशी सहकार्य करणे.

ई) वरील उद्दिष्ट्ये साध्य करण्याकरिता व मंडळाची धोरणे अंमलात आणण्याकरिता वेळोवेळी व जरूरी भासेल त्याप्रमाणे निर्णय घेणे.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या उद्दिष्टांचा सविस्तर विचार पुढीलप्रमाणे होऊ शकतो. कोणतेही संघटन निश्चित ध्येयप्राप्तीसाठी निर्माण होत असते. संघटनांची उद्दिष्ट्ये, कार्यक्रम निश्चित केलेली असतात. २२ मार्च १९७० रोजी अशाच अनेक विधायक उद्दिष्टांना पूर्ण कऱ्यासाठी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळा'ची स्थापना झाली. म्हणून मंडळाच्या उद्दिष्टांना समजून घेणे गरजेचे आहे.

१) मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी हिंदू-मुस्लिम समूदायामध्ये ऐक्य प्रस्थापीत करून राष्ट्रीय एकात्मतेला अधिक भक्कम करणे हे एक आहे. हमीद दलवाईच्या मते मुस्लिम समाज सनातनी मुस्लिम नेते व धर्मगुरू यांच्या प्रभावाखाली वाढलेला आहे. त्यामुळे हा समाज जमातवादाकडे, वळलेला आहे. धर्मांध मंडळी या समाजाला इतर समाजापासून तोडू पाहत आहेत. त्यामुळे हा समाज इतर समाजापासून फटकून वागत आहे. म्हणून या समाजाला प्रबोधन व जागृतिच्या माध्यमाने राष्ट्रीय प्रवाहात सामील करून राष्ट्रीय एकात्मता आबाधीत ठेवण्यासाठी व हिंदू-मुस्लिम ऐक्य निर्माण करणे हे मंडळाने उद्दिष्ट मानले आहे.

२)   दुसरे उद्दिष्ट म्हणजे, मुस्लिम समाजामध्ये धर्माकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टीकोन बदलून वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करणे. मुस्लिम सत्यशोधक असे मानतो की, भारतीय मुस्लिम समाज मध्ययुगीन कालबाह्य प्रथा परंपरांना चिकटून बसलेला आहे. परिपूर्ण समजण्यात आलेल्या इस्लाम धर्मामध्ये सनातनी धर्मगुरू, उलेमा मंडळी धार्मिक चिकित्सेला तयार होत नाहीत. धर्मचिकित्सेला वावच दिला जात नाही. स्वार्थी राजकारणासाठी ही धर्ममार्तंड मंडळी कालबाह्य प्रथा परंपरांचे जतन आणि पुनरूत्थानाच्या कार्यात धन्यता मानीत आल्याने हा समाज मागास होत चाललेला आहे. बदलत्या काळात समाजजीवनाच्या जगण्याच्या कल्पना, प्रथा परंपरा बदलत जातात. बदल आणि गतीशिलता हेच जीवंतपणाचे लक्षण आहे. बदलत्या काळात धर्मातील कालबाह्य गोष्टी कोणत्या आणि चिरंतन कोणत्या याचा सारासार विचार करून त्या बदलण्यासाठी धर्मचिकित्सा करणे गरजेचे असते, तरच धर्माचा खरा आशय जिवंत राहू शकतो. म्हणून मंडळाने धर्मचिकित्सा व या समाजाचा धर्माकडे बघण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्याचे उद्दिष्ट ठरविलेले आहे.

३)   तिसरे उद्दिष्ट म्हणजे मुस्लिम स्त्रीयांमध्ये आपल्या हक्काविषयी जाणीव जागृती करणे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने मुस्लिम स्त्रीवर होणाऱ्या काही अन्यायी प्रथावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जुबानी तलाकची पद्धती, परदा पद्धत, बहुपत्नीत्व इत्यादी विषय घेवून मुस्लिम स्त्रिला न्याय मिळवून देणे हे मंडळाने आपले महत्त्वपूर्ण उद्दिष्ट मानलेले आहे. परंतु याठिकाणी महत्त्वपूर्ण बाब नमूद करणे गरजेचे आहे. ती म्हणजे अब्दुल कादर मुकादम आपल्या 'दास्तान भारतीय मुसलमानांची' या ग्रंथात असे म्हणतात की, "इस्लामने स्त्रियाविषयी निश्चित क्रांतीकारी भूमिका घेतलेली आहे. मुस्लिम व्यक्तीगत कायद्याने काही अधिकर मुस्लिम स्त्रिला दिलेले आहेत. वडिलांच्या मालमत्तेबद्दल वारसा हक्क स्त्रिला प्राप्त झालेला आहे. आजच्या परिस्थितीत तो वाटा कमी असेल परंतु सातव्या शतकात हे अधिकार होते हे विसरता

15248

येत नाही. मुकादम यांच्या मते महंमद पैगंबरांच्या काळात स्त्रियांना पुरूषाबरोबर नमाज पठन करण्यास परवानगी होती. पुढे पुरूषसत्ताक संस्कृतीचे वर्चस्व स्त्रीवर पडत गेले आणि स्त्रियांवर बंधने लादली जावू लागली.''[४]

मुस्लिम स्त्रिला इस्लामने जरी अधिकार दिलेले असले तरी स्त्रीयांवर पुरूषी वर्चस्वामुळे अन्याय होतो. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे याबद्दल स्त्रीयांमध्ये जागृती करण्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

४) ''मुस्लिम सत्यशोधक मंडळ धर्माच्या नावाखाली चालविल्या जाणाऱ्या कालबाह्य अनिष्ठ प्रथा, कायदे, परंपरा विरोधी आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाबद्दल पुष्कळांचा असा गैरसमज आहे की, मंडळ 'तलाक' (घटस्फोट) विरोधी आहे. हे अर्धसत्य आहे कारण मंडळ तलाकविरोधी नसून तलाकच्या पद्धतीच्या विरोधी आहे. कोणत्याही स्त्रिला व पुरूषाला एकत्र राहणे शक्यच नसेल तर तलाक घ्यावा अशी ठाम भूमिका मंडळाची आहे. परंतु शक्य तितके स्त्री-पुरूषाने तडजोड करावी असे मंडळ सुचविते.''[५]

काळाच्या ओघात अनेक मुस्लिम धर्मशास्त्रींनी अनेक न्यायशास्त्रांचा विकास केला त्यामध्ये कुराण हदिस इज्मा, कयास इत्यादी न्यायशास्त्रे येतात. मुस्लिम समाजात 'शरियत कायदा' मुस्लिम व्यक्तीगत कायदा ईश्वरीय मानला जातो. त्यामुळे तो अपरिवर्तनीय समजला जातो परंतु कायदे हे ज्या त्या परिस्थितीत व्यक्तीच्या व एकूणच समाजाच्या जीवन आचरणाच्या सोयीसाठी मनुष्य निर्मित असतात व काळानुसार, त्याचा सारासार विचार करून बदलावे लागते असे व्यक्तीगत कायदे निकालात काढण्याचे उद्दिष्ठ मंडळाचे आहे.''[६]

जगातील अनेक राष्ट्रांनी बदलत्या समाजाला सुसंगत कायद्याची निर्मिती केलेली आहे. आज न्याय वाटणारा कायदा किंवा प्रथा पुढच्या पिढीला त्या परिस्थितीत न्याय ठरेल असे नाही. कारण बदलत्या काळानुरूप न्यायाच्या कल्पनाच बदलत गेलेल्या

आहेत. त्यामुळे मध्ययुगीन सातव्या शतकातील कायद्यांना आजच्या काळात जसेच्या तसे कलम करणे म्हणजे समाज विकासात चार पाऊले मागे जाण्यासारखे आहे. म्हणून याबाबत जे कायदे, प्रथा कालबाह्य झालेले आहेत ते बदलण्याची मंडळाची भूमिका रास्त आहे.

महत्वाची बाब म्हणजे मंडळ बहुपत्नीत्वाच्या प्रथेविरोधी आहे. महंमद पैगंबराच्या काळात युद्धात अनेक सैनिक मारले जायचे त्यानंतर त्यांच्या स्त्रियांचा प्रश्न उद्‌भवायचा त्यावर उपाय म्हणून चार बायका करण्याचा त्यांनी कायदा केला परंतु आजची परिस्थिती बदलली. १००० पुरूषामागची स्त्रियांची संख्या घटली. मग हा कायदा उपयुक्त ठरत नाही. स्त्रीवर हा अन्याय आहे म्हणून मंडळ बहुपत्नीत्वाला विरोध करणे हे उद्दिष्ट मानते. "ज्या काळात प्रेशित महमंदाचा जन्म झाला, त्या काळचा अरबस्तान हा एक असंस्कृत मागासलेला व रानटी टोळ्यांचा प्रदेश होता. तेथे गुलामांसारखेच स्त्रियांचे बाजार भरत. स्त्री ही उपभोग्य वस्तू (कमॉडिटी) समजली जाई. मालमत्ताच समजली जाई. स्त्रीला पुरूषाप्रमाणेच भावना असतात. सुख-दु:ख असते, तिही माणूस आहे. हा विचारच ते रानटी अरब करू शकत नव्हते. स्त्रीकडे बघण्याच्या दृष्टीकोनातच बदल करण्यास अशा या रानटी मागासलेल्या जमातीस पैगंबरांनी भाग पाडले. युद्धात मरण पावलेल्यांच्या विधवांचे हाल होऊ नयेत, मुलांचे पुनर्वसन व्हावे व अनेक बायकांचे कळप बाळगणाऱ्यांना लगाम घालावा या उद्देशाने चार बायका करण्याचा अधिकार त्या काळात पैगंबरांनी दिला. त्यातही अनेक शर्ती घातल्या. स्त्रियांना किमान माणूस म्हणून जगविण्याची यामागे धडपड होती. त्या कायद्यांनाच त्यांचे अनुयायी धर्म म्हणून कवटाळून बसले आहेत."[७]

अर्थात मुस्लिम समुदायातील धर्मनिष्ठ मंडळीमुळे व त्यांच्या हेकेखोरपणामुळे हा समाज धर्म आणि नीती यातील फरक करू शकला नाही. थोडक्यात 'आदत' आणि 'इबादत' या दोन शब्दातील फरक या धर्मपंडिताना न उमगल्याने बहुपत्नीत्वाला ते आपला हक्क समजून बसले. मुस्लिम सत्यशोधक मंडळाला याबद्दल सकारात्मक बदल घडवायचे आहेत.

५)  मंडळाच्या उद्दिष्ठांमध्ये समान नागरी कायदा करणे ह्या एका उद्दिष्ठाचा समावेश आहे. हिंदु-मुस्लिम ऐक्य आणि राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असा हा समान नागरी कायदा आहे. हिंदू स्त्रियांना हक्क मिळवून देणारा सन १९५५ साली हिंदू सनातन्यांना न जुमानता 'हिंदू कोड बिल' पास केला. समान नागरी कायदा करून मुस्लिम स्त्रिला न्याय संरक्षण मिळविण्यासाठी प्रयत्न करणे हे मंडळाचे उद्दिष्ट आहे. परिपूर्ण समजल्या जाणाऱ्या इस्लाममध्ये शरियत कायदा हा ईश्वरीय व धर्माचा भाग समजण्यात येतो. त्यामुळे त्यामध्ये बदल हा धर्मामध्ये हस्तक्षेप आहे. असा युक्तीवाद अंधश्रद्धाळू मंडळी करतात. या भूमिकेतून समान नागरी कायद्याबद्दल चुकीच्या समजूतीमुळे हा समाज त्यास विरोध करतो.

६)  मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे आणखी एक उद्दिष्ट म्हणजे भाषेबद्दल मंडळाने घेतलेली भूमिका भारतीय भाषा म्हणून उर्दू भाषेचा विकास व्हावा असे मंडळाला वाटते. उर्दू भाषेबद्दल मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्पष्ट भूमिका आहे. मंडळ उर्दू ही भारतीय मुसलमानांची भाषा मानीत नाही. फार तर उत्तर भारतीय काही हिंदू व मुसलमानांची ती भाषा आहे. फक्त महाराष्ट्राचा विचार केल्यास महाराष्ट्रीयन मुसलमानांची भाषा मराठी आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाच्या धार्मिक नेत्याने व मुस्लिम समाजाने उर्दूचा आग्रह धरू नये. ज्या त्या राज्यातील प्रादेशिक भाषेतून शिक्षण घ्यावे. महाराष्ट्रात मराठी भाषेतून मुसलमानांनी शिक्षण घ्यावे. उर्दू मुळे मुस्लिम समाजामध्ये अलगता वाढते. उर्दू भाषा ही भारतीय भाषा असल्याने त्याचा विकास व्हावा मात्र मुस्लिमांनी ही आमची भाषा आहे म्हणून तीचा आग्रह धरू नये अशी उर्दू भाषेबद्दलची मंडळाची भूमिका आहे.

उर्दू बाबतीत भारतीय मुस्लिम समाजातील काही मंडळी कमालीची आग्रहाची भूमिका घेताना दिसतात. जातीवादी मौलवी लोक उर्दू ही मुसलमानांची भाषा आहे असा प्रचार करतात. त्यामुळे उर्दू भाषेच्या उदयाची कारणमिमांसा करणे गरजेचे आहे.

उर्दू ही मुसलमानांची भाषा नाही. भारताशिवाय अन्य कोठेही उर्दू भाषा बोलली जात नाही. धर्म हा घटक भाषेशी भिन्न असा आहे. व्यक्ती ज्या देशात राहते, ज्या प्रदेशात राहते त्या प्रदेशाची भाषा व्यक्तीची बोलीभाषा बनते. म्हणून जर उर्दू ही मुसलमानांची भाषा असली तर संपूर्ण जगातील सर्व मुस्लिम राष्ट्रात उर्दू भाषा बोलली गेली असती तसे कुठेच आढळत नाही. मुळात उर्दूचा भारतातील उदय "मुसलमानधर्मीय राजवटी भारतात स्थिरावल्या त्या काळी राज्यकारभार चालविण्यासाठी लागणारा वरिष्ठ नोकरवर्ग हा सुद्धा मुसलमान राजाप्रमाणे परकीय होता. व त्यामुळे राजा, अमीर, उमराव, सैनिक इतर अधिकारी वर्ग हे परकीय म्हणजे फारशी भाषा बोलणारे होते. साहजिकच राज्यकारभार फारशी भाषेतून चालत असे. मोगल अमदानीत स्थानिक जनतेचा राज्यकारभाराशी, दरबाराशी घनिष्ठ संबंध येवू लागला तेव्हा मोगलांच्या काळातही फारशी हीच दरबाराची व राज्यकारभाराची भाषा होती. वरिष्ठ नोकरवर्ग जरी परकीय व फारशी भाषा बोलणारा होता तरी कनिष्ठ नोकरवर्ग हा स्थानिक भारतीय होता. साधे सैनिकसुद्धा रजपूत व जाट असत व त्यांची मातृभाषा हिंदी होती. त्यांना फारशी येत नसे आणि यातूनच गरज भागविण्याच्या निकडीतून फारशी व हिंदी यांच्या मिश्रणातून उर्दू भाषेचा जन्म झाला."[८]

७) मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या मुख्य उद्दिष्टामध्ये धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेची निर्मिती करणे आणि राष्ट्रीय एकात्मतेस पोषक वातावरण निर्माण करणे हे महत्त्वपूर्ण उद्दिष्ठ आहे. "धर्मामधील ईश्वरविषयक कल्पना असलेल्या भागाचा राजसत्तेतील हस्तक्षेप थांबवावा हे ज्यावेळी काही विचावंतांना वाटू लागले त्याच वेळी सेक्युलॅरिझची प्रक्रिया सुरू झाली."[९] यापूर्वी धर्म आणि राज्यसत्ता यांची सरमिसळ केली जात होती. "धर्माचा उपयोग राजकारणासाठी जेव्हा होतो. तेव्हा त्यास जमातवाद म्हणतात."[१०] भारतामध्ये हिंदू-मुस्लिम जमातवाद वाढू नये यासाठी धर्मनिरपेक्ष समाज व्यवस्थेला बळकटी देवून भारतीय राष्ट्रीय ऐक्यास अधिक बळकटी देण्याचे उद्दिष्ट मंडळाने मानलेले आहे.

सारांश असा की, समान नागरी कायदा करणे, मुस्लिम स्त्रीयांमध्ये राजकीय जागृती व हक्काविषयी जाणीव निर्माण करणे, तलाकपिडीत मुस्लिम स्त्रीयांना पोटगी मिळवून देणे. बहुपत्नीत्वाच्या पद्धतीला विरोध करणे, स्त्रीयांच्या शिक्षणाला पाठींबा देणे, विभिन्न परिषदा, परिसंवाद, सभा, प्रकाशने यांच्या माध्यमाने समाज प्रबोधन करणे. मुलतत्ववाद, जमावादाला नष्ट करून राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रयत्नशील राहणे अशा अनेक उद्दिष्टांबरोबर भारतीय मुस्लिमामध्ये प्रबोधनाचे आंदोलन चालविणे, धर्मचिकित्सेची परंपरा मुस्लिम समाजात घालून मुस्लिम समाजाला वैज्ञानिक बनविणे. वाचनालयाच्या माध्यमातून प्रबोधन इत्यादी उद्दिष्टाने मंडळाची स्थापना झाली.

**मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संघटन :**

कोणत्याही उद्दिष्टाची प्राप्ती संघटनेशिवाय शक्य नसते. मुस्लिम सत्यशोधक मंडळ निश्चित अशी उद्दिष्ट्ये समोर ठेवून स्थापन करण्यात आले. मुस्लिम सत्यशोधक मंडळामध्ये कार्याचे विभाजन व्हावे. मंडळाच्या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी पाच वर्षाला कार्यकारिणी निर्माण केली जाते. मंडळाच्या घटनेतील अनुच्छेद दोन नुसार मंडळाचे मुख्य कार्यालय पुणे या ठिकाणी आणि त्याच्या शाखा भारतात कुठेही असू शकतील असा स्पष्ट उल्लेख आहे. मंडळामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, सहचिटणीस, खजिनदार, प्रसिद्धी प्रमुख, सभासद अशी पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. मंडळाची घटना कलम ४ नुसार कोणत्याही १८ वर्षावरील मुस्लिम स्त्री-पुरूषाला सभासद होता येते. मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या घटनेच्या कलम ५(१) नुसार सभासदत्वाचे १) अजीव सभासद २) साधारण सभासद ३) विद्यार्थी सभासद ४) सांघिक सभासद असे मंडळाचे चार प्रकार सांगीतलेले आहेत. साधारण व अजीव सभासदांनाच फक्त मतदानाचा हक्क दिला गेलेला आहे. मंडळाच्या कार्यकारी समितीद्वारे विभिन्न सभा घेतल्या जातात. त्यामध्ये १) सर्वसाधारण सभा २) वार्षिक सर्वसाधारण सभा ३) विशेष सर्वसाधारण सभा इत्यादी सभा घेवून मंडळ वार्षिक कामाना हिशोबाचा आढावा घेण्याचे काम करते.

मंडळाच्या कार्यकारी समितीची निर्मिती पाच वर्षासाठी होते. त्यामध्ये ७ पेक्षा जास्त सभासद निवडता येत नाहीत. मंडळाचे आर्थिक वर्ष १ जानेवारी ते ३१ डिसेंबर हे आहे. मंडळासाठी निधी देणग्या, वाङ्मय निधी, विभिन्न संस्थाकडून मदत घेवून उभा केला जातो.

**मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य :**

"मुस्लिम सत्यशोधक मंडळाने जी तत्वप्रणाली प्रत्यक्ष व्यवहारात उतरविली अशी जगात कुठेही व्यवहार्य व सडेतोड तत्वप्रणाली जागतिक मुस्लिम इतिहासात सापडत नाही. मुस्लिम सत्यशोधक मंडळाची तत्वप्रणाली कुठल्याही कार्यरत चळवळीच्या तत्वप्रणालीप्रमाणे लवचिक आहे. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे तत्वज्ञान मनुष्य केंद्रीत आहे. 'इबादत' व 'आदत' हे दोन भाग आहेत असे मुस्लिम सत्यशोधक मंडळ मानते."[११] समाजजीवनातील प्रथा, परंपरा, नीती, नियम काळानूसार बदलतात कारण मनुष्याला कालबाह्य वाटणाऱ्या प्रत्येक घटकांना बदलण्यातच जीवंतपणाचे व गतीशिलतेचे लक्षण आहे. मंडळाची बदलत्या काळानूसार कालबाह्य गोष्टी बदलण्याची भूमिका आहे.

मुस्लिम सत्यशोधक सुधारणावादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही व्यवस्थेला मान्यता देतो. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व इत्यादी लोकशाही मूल्याइतकेच महत्त्व धर्मनिरपेक्षतेला मंडळ देतो. स्त्री-पुरूष समतेचे मंडळ समर्थन करते. स्पृश-अस्पृश्यता मंडळ मानीत नाही. मंडळाचा आपल्या उद्दिष्ठपूर्तीसाठी घटनात्मक मार्गामध्ये विश्वास आहे.

राजकीय व सामाजिक प्रबोधन व राष्ट्रीय एकात्मतेसाठी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाने' महत्त्वाचे योगदान दिले. मंडळाचे कार्य प्रामुख्याने प्रकाशने काढणे, जाहीर सभा घेणे. मोर्चे काढणे, मोर्चे काढून विभिन्न निवेदने देणे, धरणे आंदोलन करणे. तसेच घटनात्मक मार्गाने सत्याग्रह, उपोषण करणे, मंडळाच्या कार्यकर्त्याने राष्ट्रीय,

प्रादेशिक व स्थानिक पातळीवर सभा, शिबिरे, परिसंवाद, परिषदात भाग घेणे, पाहणी करणे, संशोधन व विविध सांस्कृतिक कार्यक्रम पथनाट्यांच्या माध्यमाने समाज प्रबोधन करणे इत्यादी मार्गाने पार पाडले जाते.

"सन १९६६ ते १९७७ अशी उणीपुरी ११ वर्षे हमीद दलवाईंना मुस्लिम सत्यशोधक चळवळीसाठी देता आली. नवी दिल्लीची ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर फॉरवर्ड लुकिंग मुस्लिमस्, पुण्याची महाराष्ट्र राज्य मुस्लिम महिला परिषद, तसेच मुंबईची मुस्लिम सामाजिक परिषद त्याचबरोबर कोल्हापूरची 'मुस्लिम शिक्षण परिषद असे ठळक कार्यक्रम दलवाई यांनी मंडळाद्वारे आयोजित केले व यशस्वी करून दाखवले."[१२] दलवाई यांनी तलाकपिडीत सात महिलांचा मुंबई या ठिकाणी मोर्चा काढला. त्याच्या प्रत्यक्ष कृतीची ही सुरूवात होती. परंतु त्यांनी त्यापूर्वी लेख, व्याख्याने, कथालेखन इत्यादी मार्गाने समाज प्रबोधनाचे कार्य सुरू होते.

"२२ मार्च १९७० रोजी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाची' स्थापना झाली. त्यानंतर लगेच २८ नोव्हेंबरला पुण्यामधील नेहरू मेमोरियल हॉलमध्ये 'अखिल महाराष्ट्र मुस्लिम परिषद' झाली. ही परिषद इंडियन सेक्युलर सोसायटी व मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आली. परिषदेस सुमारे २०० प्रतिनीधी बेळगांव, कोल्हापूर, अमरावती, इंदुर, त्रिवेंद्रम इत्यादी ठिकाणचे लोक उपस्थित राहिले. यामधील ५६ मुस्लिम प्रतिनिधीमध्ये १२ स्त्री प्रनिनिधी होत्या. हमीद दलवाई अध्यक्षस्थानी होते. त्यांनी परिषदेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. ही परिषद यशस्वी ठरली कारण, परिषदेनंतर अलिबाग, इचलकरंजी, चिपळूण, निपाणी, फलटण, अमरावती, पंढरपूर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, श्रीगोंदा, मुंबई, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या' शाखा स्थापन झाल्या."[१३]

हमीद दलवाई यांना मुस्लिम सत्यशोधक मंडळाची ही चळवळ राष्ट्रीय पातळीवर घेवून जाण्याचा वेध लागलेला होता. त्यासाठी मुस्लिम सत्यशोधक मंडळ

आणि इंडियन सेक्युलर सोसायटीच्या वतीने डिसेंबर १९७१ मध्ये दिल्ली येथे 'All India Conference For Word Loking Muslims' चे आयोजन करण्यात आले. संपूर्ण भारत आणि बांग्लादेशातून मिळून सुमारे १०० प्रतिनिधी परिषदेस उपस्थित होते. एकट्या महाराष्ट्रातून ५० प्रतिनिधी या परिषदेस उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्ष हमीद दलवाई होते. परिषदेचे संचलन प्रा. अ. भि. शाहानी केले. मेहबुबुल हक हे बांग्लादेशी प्रतिनिधी होते. त्यांचे मुख्य भाषण परिषदेत झाले. परिषदेमध्ये संपूर्ण चर्चेअंती काही ठराव संमत करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने कुंटुंबनियोजन प्रसारासाठी पाठींबा, बांग्लादेशाच्या निर्मितीस पाठींबा देणे. इत्यादी विषयावर सर्वमताने ठराव सहमत ठरले.

"मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटीच्या माध्यमाने २७ व २८ डिसेंबर १९७१ रोजी पुण्यात 'मुस्लिम महिला परिषद' घेतली गेली. त्यास १७६ महिला उपस्थित राहिल्या. परिषदेमध्ये मुस्लिम स्त्रीयांना समान हक्क, द्विभार्या प्रतिबंध, जूबानी तलाक रद्द करणे. इत्यादी विषयावर चर्चा झाली."[१४] पुण्यातील या मुस्लिम महिला परिषदेचे महत्त्वपूर्ण वैशिष्टये म्हणजे मुस्लिम स्त्रियांनी एकत्र येऊन आपल्या न्याय हक्काची मागणी करणारी ही भारतातील पहिली परिषद होती. यावरून मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या क्रांतीकारी कार्याची प्रचिती येते. परिषदेच्या अध्यक्षस्थानी शरीफा तय्यबजी होत्या. परिषदेस हमीद दलवाई, सय्यद भाई, हुसेन जमादार, इत्यादी मंडळाच्या प्रमुख कार्यकर्त्यांबरोबर इतरही बरेचसे कार्यकर्ते हजर होते. परिषदेत एस. एम. जोशी, हरिभाऊ परांजपे यांची दोन दिवसांची विशेष उपस्थिती लाभली.

"पुण्यातील मंडळाचे काही कार्यकर्ते आणि हमीद दलवाई यांनी मंडळाची भूमिका समजावून सांगण्यासाठी पुण्यात घरोघरी जावून संपर्क मोहिम सुरू केली. पुण्यातील मोमीनपुरामध्ये ही मोहिम राबविताना गैरसमजातून काही मुस्लिम लोकांनी

हमीद दलवाई व मंडळाच्या कार्यकर्त्यावर हल्ला केला. मुस्लिम समाज प्रबोधनाचे कार्य किती कठीण आहे या जाणीवेतून मंडळाचे कार्यकर्ते दुप्पट जोमाने कार्यास लागले.''[१५]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे विधायक कार्य चालू असतानाच मंडळाच्या एकूण कार्याची, कामकाज व भूमिकेविषयी मंडळाच्या हितचिंतकांना व हिंदू-मुस्लिम समाजापर्यंत माहिती पोहोचावी यासाठी सन १९७३ मध्ये जानेवारी महिन्यात मंडळाच्या मुखपत्राचा पहिला अंक प्रकाशित झाला. मंडळाच्या मुखपत्राचे कार्यकारी संपादक कोल्हापूरचे हुसेन जमादार झाले. मुस्लिम सत्यशोधक पत्रिकेच्या माध्यमाने मंडळाच्या भूमिकेचा व कार्याचा आढावा समाजापर्यंत जावा हा आणि मुस्लिम समाजाला मंडळाची भूमिका समजावी हा एक उद्देश त्या पाठीमागे होता.

''मंडळाच्या कार्यातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे २७ जानेवारी व २८ डिसेंबर १९७२ ला मुंबईत मुस्लिम व्यक्तीगत कायद्यात बदल होवू नये असे सांगण्यासाठी 'अखिल भारतीय मुस्लिम परिषद भरली. ही परिषद ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या माध्यमाने भरली. त्यासाठी १०,००० मुस्लिम लोक उपस्थित होते. समान नागरी कायद्याला विरोध करणे हा मुख्य उद्देश परिषदेचा होता. त्या परिषदेच्या विरोधात हमीद दलवाई आणि 'युक्रांद'च्या काही मोजक्याच कार्यकर्त्यांना घेवून त्याविरोधी निदर्शने करण्याचे जीवघेणे धाडस केले. याची महाराष्ट्रभर प्रसारमाध्यमाने नोंद घेतली.''[१६]

''मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या माध्यमाने घेतलेली ही परिषद जमातवादी मुस्लिमांनी घेतलेली होती. या परिषदेमध्ये जी व्यक्तव्ये करण्यात आली ती पाहिल्यास या परिषदेत भाग घेणारे मुस्लिमांचे स्वयंभू पुढारी भारतीय मुसलमांना राष्ट्रीयजीवन प्रवाहातून अलग ठेवण्याचा प्रयत्न करीत होते असे गणी फरास यांचे मत आहे.''[१७]

या परिषदेत काही ठराव संमत करण्यात आले त्यापैकी महत्त्वाचे ठराव असे.

१) 'शरियत' अपरिवर्तनीय आहे त्यामुळे त्यामध्ये दुरूस्ती करण्याचा अधिकार सुधारण्याच्या नावाखाली करता येणार नाही.

२) पार्लमेंट किंवा राज्याच्या विधानसभांना इस्लामी शरीयतीत बदल किंवा दुरूस्ती सुचविण्याचा काहीच हक्क नाही.

३) संविधानाने आम्हाला धार्मिक स्वातंत्र्य दिल्याने आम्ही आमच्या धार्मिक स्वातंत्र्याला आबाधीत राखू शकतो.

अशा पद्धतीने मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाच्या परिषदेत बिनबुडाचे ठराव सहमत झाले कारण एकीकडे भारतीय संविधानास आव्हान देण्यात आले तर दुसऱ्याच ठरावामध्ये ही मंडळी धार्मिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी भारतीय संविधानाचा आधार घेतला. म्हणजे भारतीय संविधान धार्मिक स्वातंत्र्य उपभोगण्याच्या बाबतीत या लोकांना आवश्यक आहे मात्र मुस्लिम व्यक्तीगत कायद्यात बदलाच्या बाबतीत मुद्दा असेल तर ते हक्क संविधानाला ही मंडळी नाकारतात. मग ते बदल समाजाच्या विकासाचे का असेनात.

"जातीवाद्यांच्या या परिषदेला आव्हान देण्यासाठी ११ मार्च १९७३ रोजी मराठा मंदीर, मुंबई या ठिकाणी जिवाजीराव शिंदे हॉलमध्ये 'महाराष्ट्र मुस्लिम सामाजिक परिषद मंडळाने भरविली. इंडियन सेक्युलर सोसायटीचे त्यास सहकार्य होतेच. पुणे, मुंबई, मुंबई उपनगरे, कोल्हापूर, निपाणी, आजरा, सांगली, सोलापूर, अमरावती, नागपूर, अहमदनगर, वर्धा, फलटण, चिपळूण, सासवड, भिवंडी, पालघर, गुलबर्गा, श्रीगोंदा इत्यादी ठिकाणाहून ३०० प्रतिनिधी हजर होते. त्यापैकी ५० स्त्री प्रतिनिधी होत्या. जिवाजीराव शिंदे हॉलमध्ये 'मुस्लिम समाजाला मुल्ला, मौलवी, उलेमांच्या मगरमिठीतून मुक्त करा!' 'मुस्लिम स्त्रियांना मूलभूत हक्क मिळालेच पाहिजेत!', 'जातीयता हटवा आणि मुसलमानाना वाचवा!' अशा नावाचे तीन मराठीतून तर एक 'जुबानी तलाक बंद करो!' असा उर्दूमधील फलक लावण्यात आलेले होते. प्रा. असफ ए. फैजी, अ. भि. शहा, डॉ. मोईन शाकीर आदींनी प्रतिनिधीना मार्गदर्शन केले.

मुस्लिम स्त्रियांना समान हक्कांची कायदेशीर व्यवस्था, मुस्लिमांचे शिक्षण मातृभाषेतून व्हावे 'समान नागरी कायदा करावा' इत्यादीवर चर्चा झाली.''[१८]

भारतीय संविधान अनुच्छेद १२५ नुसार तलाकबद्दल महत्त्वपूर्ण निर्णय झाला. त्यामुळे मुस्लिम तलाकपिडीत स्त्रीला पोटगीचा हक्क प्राप्त झाला. 'मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमाने तलाकपिडीत मुस्लिम महिलांना पोटगी मिळवून देण्यासाठी "मंडळाच्या वतीने हुसेन जमादार (कोल्हापूर) यांच्या प्रयत्नातून या कायद्याविषयी मोफत सल्ला देण्याचे विधायक कार्य अॅड. समुद्रे, अॅड. अविनाश खंडेराव, महाडीक इत्यादीनी केले.''[१९]

"मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि इंडियन सेक्युलर सोसायटीच्या माध्यमाने कोल्हापूरच्या केशवराव भोसले नाट्यगृहात ३० व ३१ डिसेंबर १९७३ रोजी 'मुस्लिम शिक्षण परिषद' भरली. परिषदेचे उद्घाटन प्रा. अ. भि. शहा यांनी केले. हमीद दलवाई अध्यक्षस्थानी होते. याशिवाय अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे, प्रा. ना. गो. कालेलकर, एस. एम. जोशी, आदींनी परिषदेत मार्गदर्शन केले. परभणी, जळगाव, उस्मानाबाद, नाशिक, बीड, ठाणे, कुलाबा, धुळे, चंद्रपूर, रत्नागिरी, चिपळूण, कणकवली, मनमाड, श्रीगोंदा, अहमदनगर, अमरावती, पंढरपूर, सोलापूर, सांगली, सातारा, कऱ्हाड, पुणे, मुंबई, आजरा, अकोला, निपाणी, कोल्हापूर आदी ठिकाणाहून सुमारे ८०० प्रतिनीधी या परिषदेला हजर होते. त्यापैकी २५० स्त्री प्रतिनिधी होत्या.''[२०] कोल्हापूर येथे मुस्लिम परिषद यशस्वी झाली. कारण लोकांचा प्रचंड प्रतिसाद या परिषदेस मिळाला. शिक्षण विषयक योग्य भूमिका परिषदेत घेण्यात आली. "शिक्षणाचे माध्यम म्हणून उर्दू ऐवजी प्रादेशिक भाषेचा अंगीकार, 'वक्फ' संस्था सरकारने धर्मनिरपेक्ष संस्थांच्या ताब्यात द्यावी व मुस्लिमांचा विकास विशेषत: शैक्षणिक विकास साधण्यासाठी त्याचा विनियोग; माध्यमिक पर्यंतच्या मोफत शिक्षणाची सोय व मोफत उच्चशिक्षणासाठीची पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रू. १२००/- वरून रू. ५०००/- पर्यंत नेणे. मदरसा पद्धतीच्या शिक्षणाचे आधुनिकीकरण करणे इत्यादी विषयावर चर्चा होवून ठराव संमत झाले.''[२१]

चिपळूण या ठिकाणी दि. ९ जून १९७४ रोजी मुस्लिम महिलांचा मेळावा अतिशय तंग वातावरणात पार पडला. जमातवाद्यांनी मेळाव्या विरोधात निदर्शने केली. रस्ते रोकले, धमक्या दिल्या, बहुसंख्येने दलवाई यांच्या मिरजोळी येथील घरी दगडफेक केली. इतका तणाव असतानाही हा मेळावा पार पडला. मेळाव्याचे उद्घाटन डॉ. शमीम अत्तार यांनी तर अध्यक्षस्थान मेहरून्निसा दलवाई यांनी भुषवले. समान नागरी कायद्याची मागणी करून स्थानिक कमिटीच्या माध्यमाने मुस्लिम भगिनींच्या पर्यंत मंडळाचा प्रसार करण्याचे ठरले. "२ नोव्हेंबर १९७५ रोजी कोल्हापूरातील पहिली तलाकपिडीत महिला परिषद मंडळाच्या वतीने पार पडली. या परिषदेच्या कामासाठी हुसेन जमादार यांनी परिश्रम घेतले."[२२]

३ मे १९७७ रोजी हमीद दलवाई यांचा मृत्यू झाला. हमीद दलवाई यांच्या आजारपणाच्या काळात समाजवादी विचारांचा पगडा असलेले पुण्यातील सय्यदभाई यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांनी 'जिहादे-तलाक' मोहिम सुरू केली. ती आजतागायत सुरू आहे. सय्यदभाई यांनी पोटगी प्रश्नी शहाबानू यांची पंतप्रधानांशी भेट घालून दिली. सय्यदभाई यांनी महाराष्ट्रा बाहेरील मध्यप्रदेश, गुजरात, ओरिसा, दिल्ली, उत्तरप्रदेश, कर्नाटक, गोवा आदी राज्यातील पुरोगामी मंडळीशी भेटी घेतल्या. त्यातूनच "All India Prograsive muslim Confarance" हे राष्ट्रीय व्यासपीठ उभे राहिले. हमीद भाईंचे स्वप्न सय्यदभाईंच्या प्रयत्नातून पूर्ण झाले.

सय्यद भाई प्रमाणेच कोल्हापूरच्या हुसेन जमादार यांनी मंडळाच्या कार्यात बहुमोल योगदान दिले. हुसेन जमादार आणि मेहरून्निसा दलवाई यांनी महाराष्ट्र तलाक मुक्ती मोर्चा अनेक कारणाने गाजला. आजही सय्यदभाई, हुसेन जमादार मुस्लिम प्रश्नांना घेवून लिखाण करताना आणि झगडताना दिसतात. त्याच बरोबर मुंबईचे अब्दुल कादर मुकादम यांचेही बहुमोल योगदान मंडळाच्या जडणघडणीत व कार्यात आहे. सोलापूरचे प्रो. डॉ. फकरूद्दीन बेन्नुर यांनी जरी मंडळामध्ये अल्पकाळ कार्य

केले तरी मंडळाच्या अनेक उद्दिष्टांपैकी त्यांना पटणाऱ्या उद्दिष्टासाठी आजही ते झगडताना दिसातात. यावरून मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्याचे यश दिसून येते. स्त्रीयांच्या अनेक उपक्रमातील सहभाग हा स्त्रीयामधील आपल्या हक्काविषयी निर्माण झालेली जाणीव व जागृतीच म्हणावी लागते.

दलवाई यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी मेहरून्निसा दलवाई यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. तलाक पिडीत स्त्रियांच्या मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि आर्थिक प्रश्न सोडविण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. त्यांना आंतरभारती तर्फे १९८१ साली 'सुमन बी. अँथनी' पुरस्कार मिळाला. १९८५ सालच्या 'राजर्षी शाहू पुरस्कार' देवून त्यांना गौरविण्यात आले. "१९७८ साली अमरावतीचे मंडळाचे कार्यकर्ते वजीर पटेल यांनी अमरावतीमध्ये विदर्भातील सातशे महिलांची भरघोस उपस्थितीने तलाक पिडीत मुस्लिम महिला परिषद यशस्वी केली."[२३]

मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यात मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांबरोबर ना. शरद पवार, दिवंगत प्रा. अ. भि. शहा, भाई वैद्य, बाबा आढाव, यदूनाथ थत्ते, सय्यदभाई, अब्दुलकादर मुकादम, हुसेन जमादार, मेहरून्निसा दलवाई, निळू फुले, निळूभाऊ लिमये, कोरगावकर ट्रस्ट, अनिलपंत कोरगांवकर, इंडियन सेक्युलर सोसायटी, राष्ट्र सेवा दल, महात्मा फुले समता प्रतिष्ठान, समाजवादी महिला सभा, मंडलीक ट्रस्ट, महिला दक्षता समिती, आंतरभारती, अहमदाबादची सेवा संस्था, युक्रांद, दिल्लीची जनवादी महिला विषमता निर्मूलन समिती इत्यादी संघटना व संस्थांचा हातभार मंडळाच्या कार्याला लाभला.

सन १९७८ मध्ये अलिगढमध्ये दंगली झाल्या. त्यानिमित्ताने मेहरून्निसा दलवाई, महंमद दलवाई, हुसेन जमादार यांनी मंडळामार्फत दंगलग्रस्त भागाचा पाहणी दौरा केला. व दंगलींच्या कारणांचा शोध घेण्याचा व एकुण परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर रूईया कॉलेज, मुंबई या ठिकाणी मंडळाच्या मुंबई शाखेतर्फे 'अलीगढ विद्यापीठाचा प्रश्न' या विषयावर चर्चासत्र पार पडले.

पुण्यातील हमालभवनात मुस्लिम सत्यशोधक मंडळाने १ व २ मे १९८५ साली राज्यव्यापी सामाजिक परिषद भरविली. समान नागरी कायदा, उर्दू भाषेची समस्या, हिंदू-मुस्लिम जातीय दंगली. जातीवादी संघटनांचा वाढता प्रभाव इत्यादी विषयावर चर्चा झाली. या परिषदेस ३०० प्रतिनिधी उपस्थित राहीले.

त्यापूर्वी १९८३ साली विक्रमनगर येथे हुसने जमादार यांनी तलाकपिडीत मुस्लिम महिलांच्या मुलांसाठी वसतिगृह सुरू केले. शहाबानो खटल्याचा निकाल याचवेळी लागला. त्यामुळे मंडळाच्या वतीने आपल्या हक्कासाठी लढणाऱ्या या मुस्लिम महिलेचा पुण्यामध्ये सत्कार केला. त्या कार्यात सय्यदभाई यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

"मेहरून्निसा दलवाई यांनी १७ ऑगस्ट १९८५ साली मराठा मंदिर हॉल मुंबई या ठिकाणी 'पोटगी बचाव परिषद' घेतली. या परिषदेत काही सनातनी मंडळींनी परिषदेमध्ये गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला."[२४]

**मुस्लिम सत्यशोधक मंडळाची सद्य:स्थिती :**

"८ मे १९८२ साली हमीद दलवाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'मुस्लिम प्रबोधन व संवाद' हे मासिक कोल्हापूरातून हुसेन जमादार यांनी सुरू केले. त्याचे पुढे 'पुरोगामी मुस्लिम' असे नामांतर झाले. ते १३ वर्षे चालू होते."[२५] मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या अलीकडच्या ठळक कार्यात आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे १० एप्रिल १९९७ साली मंडळाने ५०० मुस्लिम महिलांचा मोर्चा काढला आणि मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना तोंडी तलाक पद्धत बंद करावी अशी मागणी करणारे निवेदन प्रस्तुत केले.

"९ नोव्हेंबर २००१ रोजी कोल्हापूर येथे मुस्लिम महिला अधिकार संघटन नेटवर्क मिटिंग चे आयोजन करण्यात आले. त्यासाठी आवाज-ए-निसवाँ, ऑल इंडिया प्रोग्रेसिव्ह मुस्लिम कॉन्फरन्स, मुस्लिम महिला तक्रार निवारण केंद्र, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, स्पेशल सेल टू हेल्प वूमन ॲण्ड चिल्ड्रन, वुमन्स रिसर्च ॲक्शन

ग्रुप, भारतीय महिला फेडरेशन, मासूम, सहेली ग्रुप, महिला दक्षता समिती, स्वयंसिद्धा, मुस्लिम समाज प्रबोधन व शिक्षण संस्था इत्यादी संघटनेचे सदस्य प्रतिनिधींची उपस्थिती लाभली.''[२६]

२६ नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबई या ठिकाणी काही दहशतवादी 'ताज हॉटेल' मध्ये घुसले. त्याठिकाणी अनेक निरपराध भारतीय लोकांवर तसेच परदेशी नागरिकांवर अमानुष गोळीबार केला. अतिरेक्यांनी रेल्वेस्थानकावरील लोकसमुहांवर गोळ्या झाडून अनेक लोकांचे प्राण घेतले. तसेच पोलिस दलातील अधिकाऱ्यांवरही हल्ला केल्याने महत्त्वाचे अधिकारी शहिद झाले. या पार्श्वभूमिवर मुस्लिम सत्यशोधक मंडळाने कोल्हापूर येथील मुस्लिम बोर्डिंग या ठिकाणी निषेध सभा घेवून निषेध व्यक्त करून दहशतवादाविरूद्ध भारतीयांना संघटीत होण्याचे आव्हान केले.

मुस्लिम सत्यशोधक मंडळाचा कार्याचा एकूण आढावा घेतल्यानंतर मंडळाच्या कार्याचे महत्त्वपूर्ण योगदान लक्षात येते. बदलांना सहजा सहजी सामोरे न जाणाऱ्या समाजामध्ये सामाजिक परिवर्तनासाठी दिलेला हा लढा किती अवघड आहे याची प्रचिती येते. मंडळाचे कार्य व घेतलेल्या भूमिकांबद्दल त्या काळात आणि थोड्याफार प्रमाणात आजही विरोध आहे. परंतू अंतिमत: मंडळाची भूमिका मुस्लिम समाजाला स्वीकारावी लागणार आहे. आणि तो दिवस आल्यास त्या यशात मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचा त्यामध्ये सिंहाचा वाटा राहणार आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) प्रकाशन, इंडियन सेक्युलर सोसायटी – *'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका'*, पुणे, १९७९, पृ. क्र. १६.

२) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ – *'मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल'*, पुणे १९८९, पृ. क्र. २०.

३) जमादार हुसेन – *'मुस्लिम सत्यशोधक प्रत्रिका'*, पहिली आवृत्ती, जानेवारी १९७६, पृ. क्र. २.

४) मुकादम अ. का. – *'दास्तान भारतीय मुस्लिमांची'*, प्रकाशन, मुंबई सर्वोदय फ्रेंडशिप सेंटर, २००५, पृ. क्र. १८, १९, २१, ५५.

५) प्रकाशन, इंडियन सेक्युलर सोसायटी – *'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका'*, १९८५, पृ. क्र. २१, २२.

६) उक्त – पृ. क्र. २५.

७) उक्त – पृ. क्र. २४

८) उक्त – पृ. क्र. ३३, ३४

९) उक्त – पृ. क्र. ४४.

१०) डॉ. भोळे भा. ल. – *'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण'*, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, २००३, पृ. क्र. ५३९.

११) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ – 'मुस्लिम *सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल'*, १९८९, पृ. क्र. ०८.

१२) उक्त – पृ. क्र. १३.

१३) उक्त – पृ. क्र. २०, २१.

१४) जमादार हुसेन – *'जिहाद'*, फडके प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १४१.

१५) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ — '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल*', १९८९, पृ. क्र. २१, २२.

१६) फरास गणी (लेख) — '*मुस्लिम सत्यशोधक पत्रिका*', प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ, जानेवारी १९७३, पृ. क्र. १५.

१७) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ — '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल*', १९८९, पृ. क्र. २२.

१८) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ - '*मुस्लिम सत्यशोधक पत्रिका*', खंड पहिला, १९७३, पृ. क्र. १५.

१९) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ - '*मुस्लिम सत्यशोधक पत्रिका*', खंड पहिला, जानेवारी १९७३, पृ. क्र. ४, आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल, प्रकाशन मुस्लिम सत्यशोधक मंडळ, पृ. क्र. २२, २३.

२०) जमादार हुसने — '*जिहाद*', फडके प्रकाशन, पृ. क्र. १४२.

२१) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ — '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल*', १९७३, पृ. क्र. २३.

२२) उक्त — पृ. क्र. २१.

२३) जमादार हुसेन — '*जिहाद*', फडके प्रकाशन, पृ. क्र. १४३.

२४) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ — '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल*', १९८९, पृ. क्र. २६.

२५) जमादार हुसेन — '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ (लेख)*' चोरमरे विजय (संपा.) — '*स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील परिवर्तन*', बाबुराव धारवाडे गौरव ग्रंथ, २००६, पृ. क्र. २०१.

२६) उक्त — पृ. क्र. २०६.